# जिल्हा परिषद, गडचिरोली

## मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 06 जुलै 2017 रोजीचे निर्णयानुसार रिक्त होणा-या गट-क व गट-ड मधील अनुसूचित जमातीची सरळ सेवेची पदे भरण्यासाठीची जाहिरात

जाहिरात क्रमांक:- 01 /2019 दिनांक :- 26 डिसेंबर 2019

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.308/16-ब, दिनांक 21 डिसेंबर 2019, मधील निर्देशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक 8928/2015 (चेअरमन अॅन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक 6 जुलै 2017 रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाचे आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही., असा निर्णय दिला आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांनी रिट याचिका क्रमांक 3140/2008 मध्ये दिनांक 28.09.2018 च्या आदेशान्वये माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक 31.12.2019 पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले कर्मचारी, अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर विशेष मागास प्रवर्गाचे अथवा अन्य कोणत्याही मागासवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले कर्मचारी अनुसुचित जमातीचा दावा सोडुन दिलेले कर्मचारी, नियुक्तीनंतर जात प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी विहीत मुदतीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर न केलेले अनुसुचित जमातीचे कर्मचारी, ज्या कर्मचा-यांनी त्यांचे अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या जात पडताळणी समितीच्या निर्णयाच्या विरोधात मा. न्यायालयात याचिका दाखल केलेले मात्र त्यांचे प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने किंवा मा. सर्वोच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्याच्या समितीच्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही **अशा कर्मचा-यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यानंतर अनुसुचित जमातीचे रिक्त झालेल्या पदावर जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांमधुन सेवा प्रवेश नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश आहेत.** ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण 2018/प्र.क्र.226/भाग-2/आस्था-8, दिनांक 24 डिसेंबर 2019 मधील निर्देशानुसार सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रानिम-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 19 ऑक्टोंबर 2007, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रानिमं 1216/(प्र.कै.65/ 16)/ 13-अ दिनांक 13 जुन 2018,महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-5016/ प्र.क्र.321/आस्था-8 दिनांक 23 जुलै 2018 मधील तरतुदीमध्ये अंशत: सुधारणा करुन सदर अनुसुचित जमातीचे रिक्त पदे जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे अध्यक्षतेखालील 06 सदस्यांचे( सदस्य-सचिवासह) निवड समितीचे नियंत्रणाखाली सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 13 जुन 2018 च्या शासन निर्णयातील ऑनलाईन परीक्षेशी संबंधीत मुद्दे वगळता त्या शासन निर्णयातील सर्व धोरणात्मक निर्णय व कार्यपध्दती जशीच्या तशी या भरती प्रक्रियेसाठी लागु करुन **ऑफलाईन पध्दतीने अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडुन** विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

### अर्ज करण्याची पध्दत:-

| | | |
|---|---|---|
| 1. | **सर्व पदांकरीता आवेदन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक** | दिनांक जाहीरात प्रकाशित पासून दिनांक 06.01.2020 पर्यंत सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत आलेले अर्ज विचारात घेतले जातील. |
| 2. | **परीक्षा शुल्क :-** | रु. 250/- राष्ट्रीयकृत बँकेव्दारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य ) जिल्हा परिषद गडचिरोली यांचे नावाने डि. डी. व्दारे |
| | | माजी सैनिक उमेदवारासाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही |
| 3. | **अर्ज सादर करण्याचे माध्यम** | **विहीत नमुन्यातील अर्ज, धनाकर्षसह (DD) पोष्टाव्दारे/ प्रत्यक्ष/कुरीयर वरील रकाना क्रमांक 01 मध्ये नमुद मुदतीत तसेच जाहीरात प्रकाशीत झाल्याचे दिनांकापासुन दिनांक 06.01.2020 पर्यंत 05.45 वेळेपर्यंत अर्ज कार्यालयात स्विकारल्या जाईल.** |

**कार्यालयीन वेळेत, प्रत्यक्ष/ पोस्ट/इतर यंत्रणेव्दारे पदनिहाय अर्ज स्विकारण्याचे स्थळ व वेळ**

| अ.क्र. | पदाचे नाव | अर्ज स्विकारण्याचे स्थळ | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | कार्यकारी अभियंता (बांध) बांधकाम विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालय 1 ला मजला, गडचिरोली 442605 फोन नं. 07132- 222309 | **सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.45 वाजेपर्यंत** **(शासकीय सुटटीचे दिवस वगळून)** |
| 2 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | | |
| 3 | प्रयोगशाळा वैज्ञानीक अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी , आरोग्य विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालय 1 ला मजला, गडचिरोली 442605 फोन नं. 07132- 222738 | |
| 4 | आरोग्य सेवक (पु) | | |
| 5 | आरोग्य सेवक (म) | | |
| 6 | अंगणवाडी पर्यवेक्षिका | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म व बाल) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालय तळ मजला, गडचिरोली 442605 फोन नं. 07132- 222387 | |
| 7 | कंत्राटी ग्रामसेवक | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा) पंचायत विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालय तळ मजला, गडचिरोली 442605 फोन नं. 07132- 222308 | |
| 8 | शिक्षण सेवक | शिक्षणाधिकारी (प्राथ) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालय 2 रा मजला गडचिरोली 442605 फोन नं. 07132- 222347 | |
| 9. | सहाय्यक शिक्षक (उ.श्रे.) मराठी विषयाकरीता | | |
| 10. | वाहनचालक | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालय तळ मजला गडचिरोली 442605 फोन नं. 07132- 222642 | |
| 11. | परिचर , गट-ड | | |

**(टिप :- अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत प्राप्त झालेलेच अर्ज स्विकारले जातील. त्यांनतर आलेले विचारात घेतले जाणार नाही. पोस्टाने / कुरीयरने व अन्य यंत्रणेव्दारे पाठविलेल्या अर्जाच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही)**

सरळसेवा भरती प्रक्रीया संदर्भात सविस्तर जाहिरात **www.zpgadchiroli.org** व **www.gadchiroli.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहीरातीतील नमुद संपूर्ण माहिती काळजीपूर्वक वाचुन विहीत नमुन्यात अर्ज सादर करावेत. सदर भरती प्रक्रीयासंबधी वेळोवेळी प्रसिध्द केलेली आवश्यक अद्यावत माहिती **www.zpgadchiroli.org** व **www.gadchiroli.nic.in** या संकेतस्थळावर प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रीया/ परीक्षा स्थगित करणे किंवा रद्य करणे, परीक्षेचा प्रकार, संवर्गनिहाय एकुण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रीया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीने राखुन ठेवलेले आहे. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही, कोणताही दावा करता येणार नाही.

**मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 06 जुलै 2017 रोजीचे निर्णयानुसार रिक्त होणा-या गट-क गट-ड मधील सरळ सेवेने अनुसूचित जमाती प्रवर्गामधून भरावयाचे पदांची नावे, रिक्त पदसंख्यांचा एकत्रित तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ. क्र. | पदांचे नांव | भरावयाची एकुण पदे | सामाजिक प्रवर्ग | महिला 30 % | खेळाडु 5% | माजी सैनिक 15% | प्रकल्पग्रस्त 5% | भुकंपग्रस्त 2% | पदवीधर/ पदविका धारक अंशकालीन कर्मचारी 10% | अनाथ 1% | अपंग 4% | समांतर आरक्षणा व्यतीरिक्त इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 01 | अनुसूचित जमाती प्रवर्ग | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| 2 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | 01 | | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| 3 | प्रयोगशाळा वैज्ञानीक अधिकारी | 02 | | 1 | - | - | - | - | - | - | - | 01 |
| 4 | आरोग्य सेवक (पु) | 02 | | - | - | - | - | - | - | - | - | 02 |
| 5 | आरोग्य सेवक (म) | 01 | | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| 6 | अंगणवाडी पर्यवेक्षिका | 05 | | - | - | 1 | - | - | 1 | - | - | 03 |
| 7 | कंत्राटी ग्रामसेवक | 05 | | 2 | - | 1 | - | - | 1 | - | - | 01 |
| 8 | शिक्षण सेवक | 19 | | 6 | 1 | 3 | 1 | - | 2 | - | 1 | 05 |
| 9. | सहाय्यक शिक्षक (उ.श्रे.) मराठी विषयाकरीता | 01 | | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| 10 | वाहनचालक | 01 | | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| 11. | परिचर , गट-ड | 01 | | - | - | - | - | - | - | - | - | 01 |
| एकुण :- | | 39 | | 09 | 01 | 05 | 01 | - | 04 | - | 01 | 18 |

**सदर भरती ही मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 06जुलै 2017 चे आदेशानूसार करण्यात येत असल्याने, व अधिसंख्य झालेली पदे भरावयाची असल्याने, समांतर आरक्षण अंतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनूसार निवड करण्यात येईल.**

**आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगीक बाबीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

**परिशिष्ट-अ**

पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर अनुषंगीक बाबी

| **अ. क्र.** | **पदांचे नांव** | **वेतनश्रेणी (सातवे वेतन आयोगानुसार)** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| 1. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) | एस-14, 38600-122800/- | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करुन असतील . | |
| 2 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | एस-8, 25500-81100/- | माध्यमीक शांलांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण. तसेच शासनाच्या तंत्रशिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रीक संस्थेकडुन घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकाची 01 वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषीत केलेली अर्हता किंवा आर्कीटेक्चरल ड्राप्ट्समन(वास्तुशास्त्रीय आरेखक) पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण किंवा कंस्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पर्यवेक्षक) पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण किंवा आरेखक (स्थापत्य) 02 वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण | |
| 3 | प्रयोगशाळा वैज्ञानीक अधिकारी | एस-13, 35400-112400/- | मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जिवशास्त्र विषय घेऊन विज्ञान विषयाची पदवी. **(हॉफ्कीन संस्थेच्या वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रामध्ये पदविका धारण करणा-यास प्राधान्य )** | |
| 4 | आरोग्य सेवक (पुरुष) 40 टक्के | एस-8, 25500-81100/- | विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण | |
| 5 | आरोग्य सेवक (महिला) | एस-8, 25500-81100/- | ज्यांची अर्हता प्राप्त सहाय्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. | |
| 6 | अंगणवाडी पर्यवेक्षिका | एस-15, 41800-132300/- | संविधानिक विद्यापीठाची खास करुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषणशास्त्र या विषयातील स्नातक पदवी धारण केलेली महिला उमेदवार. | |
| 7 | कंत्राटी ग्रामसेवक | मानधन प्रति महा रु. 6000/- एकत्रित मानधन | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य अर्हता परीक्षेत किमान 60 टक्के गुणांसह उत्तीर्ण<br>किंवा<br>शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम)<br>किंवा<br>शासन मान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यु.)<br>किंवा<br>शालांत परीक्षा उत्तीर्ण किंवा समतूल्य अर्हता, कृषी पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम, कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल आणि संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. | |
| 8 | शिक्षण सेवक | एकत्रित मानधन रु. 6000/- | माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) , मान्यताप्राप्त संस्थेचे शिक्षण शास्त्र प्रमाणपत्र (DEd), तसेच शिक्षक पात्रता परीक्षा (TET) व अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा (TAIT) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. | |
| 9 | सहाय्यक शिक्षक (उ.श्रे.) मराठी विषयाकरीता | एकत्रित मानधन रु. 8000/- | मान्यताप्राप्त विद्यापीठातील मराठी विषयातील पदवी परीक्षा किंवा सामान्य पदवी परीक्षा अंतिम वर्षास संबधित विषयासह किमान 50 गुणासह उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेचे शिक्षणशास्त्र (BEd) तसेच शिक्षक पात्रता परीक्षा (TET) व अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी परीक्षा (TAIT) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील. | |
| 10 | वाहनचालक | एस 6 : 19900-63200 | कमीत कमी इयत्ता 4 थी उत्तीर्ण, तसेच मोटार वाहने चालविण्याची अनुज्ञप्ती धारक व मोटार यंत्ररचनेचे परिपुर्ण ज्ञान | |
| 11 | परिचर, गट-ड | एस-1:- 15000-47600/- | मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमीक शाळेची कमीत कमी इयत्ता 4 थी उत्तीर्ण. | |

**वरील पदासाठी आवश्यक सामाईक अर्हता खालीलप्रमाणे असेल.**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| 1. | संगणक अर्हता | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/ 2001 /39 दिनांक 19.03.2003 मधील तरतुदीनूसार अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. यापैकी एक किंवा<br>महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्रमांक मातंस 2012/ प्र.क्र.277/39, दिनांक 04.02.2013 व पुरक पत्र क्र.मातंस 2012/प्र.क्र.270/39 दिनांक 08.01.2018 मध्ये नमुद केल्यानूसार आवश्यक संगणक अर्हता बंधनकारक आहे.<br>**(कंत्राटी ग्रामसेवक पदांकरीता सेवाप्रवेश नियमात नमुद प्रमाणे अर्ज करतांना वरील प्रमाणे संगणक अर्हता प्राप्त करणे बंधनकारक आहे.) (परिचर वगळुन)** |
| 2. | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील तरतुदीनूसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्तीवेळी हजर होतांना उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमुद केल्यानूसार हयात असलेल्या अपत्याची संख्या 2 पेक्षा अधिक असेल तर 28.03.2005 व तदनंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

**अ) लेखी परीक्षेला पात्र / अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्दीचा दिनांक :-**

दिनांक 06 जानेवारी 2020 रोजी सांयकाळी 8.00 वाजता पात्र / अपात्र उमेदवारांची यादी **www.zpgadchiroli.org** व **www.gadchiroli.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**ब) लेखी परिक्षेला पात्र /अपात्र उमेदवारांचे यादीवर आक्षेप नोंदविण्याचा दिनांक व वेळ**

:- 07.01.2020 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत.

**लेखी परिक्षेला पात्र /अपात्र उमेदवारांचे यादीवर आक्षेप नोंदविण्याचे ठिकाण** :- अर्ज सादर केलेल्या ठिकाणी व्यक्तीश: किंवा **zpgadmail@gmail.com** या ई-मेल वर

**क)लेखी परीक्षेला पात्र उमेदवाराची अंतिम यादी प्रसिध्दीचा दिनांक व वेळ** :-दिनांक 07.01.2020 रोजी सांयकाळी 8.00 वाजता

**ड) प्रवेशपत्र वितरीत करण्याचा दिनांक व वेळ** :- परीक्षेच्या आदल्या दिवशी सांयकाळी 5.45 वाजेपर्यंत आणि परीक्षेच्या 2 तास अगोदर पर्यंत जिल्हा परिषद गडचिरोलीचे संबधित विभागाकडून प्राप्त करुन घ्यावे.

लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ :-

| अ. क्र. | पदांचे नांव | संबधित विभाग | लेखी परीक्षेचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | अंगणवाडी पर्यवेक्षिका | महिला व बाल कल्याण विभाग, जि.प. गडचिरोली | 09.01.2020 | 10.30 ते 12.00 |
| 2 | वाहनचालक | सामान्य प्रशासन विभाग, जि.प. गडचिरोली | 09.01.2020 | 10.30 ते 12.00 |
| 3 | कंत्राटी ग्रामसेवक | पंचायत विभाग, जि.प. गडचिरोली | 09.01.2020 | 2.30 ते 4.00 |
| 4 | आरोग्य सेवक (पुरुष) 40 टक्के | आरोग्य विभाग, जि.प. गडचिरोली | 11.01.2020 | 10.30 ते 12.00 |
| 5 | आरोग्य सेवक (महिला) | | 11.01.2020 | 10.30 ते 12.00 |
| 6 | प्रयोगशाळा वैज्ञानीक अधिकारी | | 11.01.2020 | 2.30 ते 4.00 |
| 7 | परिचर, गट-ड | सामान्य प्रशासन विभाग, जि.प. गडचिरोली | 13.01.2020 | 10.30 ते 12.00 |
| 8 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) | बांधकाम विभाग, जि.प गडचिरोली | 13.01.2020 | 10.30 ते 12.00 |
| 9 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | | 13.01.2020 | 2.30 ते 4.00 |

**टिप :- 1. नमुना उत्तर पत्रिका www.zpgadchiroli.org व www.gadchiroli.nic.in या संकेतस्थळावर दिनांक 14.01.2020 रोजी सकाळी 10.00 वाजता प्रसिध्द करण्यात येईल.**

**2. नमुना उत्तर पत्रिकेवर आक्षेप दिनांक 14.01.2020 रोजी संध्या. 5.45 वाजता पर्यंत zpgadmail@gmail.com या ई-मेल वर सादर करण्यात यावे.**

**3. अंतिम उत्तर पत्रिकेचा नमुना दिनांक 15 जानेवारी 2020 रोजी दुपारी 3.00 वाजता www.zpgadchiroli.org व www.gadchiroli.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

**प्रश्नपत्रिकेच्या दर्जाबाबत माहिती**

**प्रत्येक पदांसाठी घेण्यात येणा-या लेखी परीक्षांची गुणसंख्या व त्यात असलेले विषय तथा प्रश्नपत्रिकेचा दर्जा याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे राहील.**

| अ. क्र. | पदाचे नांव | भाग-1 इंग्रजी | भाग-2 मराठी | भाग-3 सामान्य ज्ञान | भाग-4 तर्कक्षमता / अनुमानात्मक चाचणी | भाग-5 तांत्रिक | एकुण प्रश्न | एकुण गुण | नकारात्मक गुणदान | परीक्षेचा कालावधी (मिनीटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | | | | |
| 1 | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | 15 | 15 | 15 | 15 | 40 | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | पदविका दर्जा | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| 2 | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | 15 | 15 | 15 | 15 | 40 | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | एस.एस.सी. दर्जा | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | **प्रयोगशाळा वैज्ञानीक अधिकारी** | 15 | 15 | 15 | 15 | 40 | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ. 12 वी | पदवी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| 4. | **आरोग्य सेवक (पुरुष)** 40% | 15 | 15 | 15 | 15 | 40 | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| 5. | **आरोग्य सेवक (महिला)** | 15 | 15 | 15 | 15 | 40 | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | इ. 10 वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| 6 | **अंगणवाडी पर्यवेक्षिका** | 25 | 25 | 25 | 25 | लागु नाही | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ. 12 वी | पदवी | पदवी | | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | | |
| 7 | **कंत्राटी ग्रामसेवक** | 15 | 15 | 15 | 15 | 40 | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | इ. 12 वी | इ. 12 वी | इ. 12 वी | इ. 12 वी | पदविका | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| 8 | **शिक्षण सेवक** | सदर पदांकरीता लेखी परीक्षाऐवजी ग्राम विकास विभाग यांचे शासन पत्र क्र. संकीर्ण-2019/प्रमाणक क्र. 1190/आस्था14 दिनांक 26.12.2019 अन्वये शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक सीईटी-2015/प्र.क्र.149/टीएनटी-1/दिनांक 07.02.2019 मधील तरतुदीनूसार तसेच तद्नुषंगीक शुध्दीपत्रकाव्दारे निश्चीत केलेली अर्हता विचारात घेवून अभियोग्यता व बुध्दीमता चाचणी (TAIT) मधील गुणांचा विचार करुन निवड करण्यात येईल | | | | | | | | |
| 9 | **सहाय्यक शिक्षक (उ.श्रे.) मराठी विषयाकरीता** | | | | | | | | | |
| 10 | **वाहनचालक** | - | 40 | 40 | 20 | | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | - | इ. 4 थी | इ. 4 थी | इ. 4 थी | | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | - | मराठी | मराठी | मराठी | | | | | |
| 11 | **परिचर (वर्ग-4)** | - | 40 | 40 | 20 | लागु नाही | 100 | 200 | नाही | 90 मिनीटे |
| | काठिण्य पातळी | - | इ. 4 थी | इ. 4 थी | इ. 4 थी | | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | - | मराठी | मराठी | मराठी | | | | | |

## 1. लेखी परिक्षेचा दर्जा / स्तर

1) लेखी परिक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहीत करण्यात आलेल्या किमान शैक्षणीक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

2) ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमीक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी ) दर्जाच्या समान राहील.

## 2. लेखी परिक्षेव्दारे निवडीची कार्यपध्दती.

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक 13 जुन 2018 नुसार गट-क संवर्गातील पदे भरतांना खालील पध्दती अनुसरण्यात येईल.

1. गट-क व गट-ड मधील सर्व पदांकरिता उमेदवारांची निवड करतांना 200 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
2. अशा परीक्षांमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे किमान 45% गुण मिळविणा-या उमेदवारांमधुन निवड सुची तयार करण्यात येईल.
3. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी या तांत्रिक संवर्गातील पदांच्या तांत्रिक भागाचे प्रश्न इंग्रजी माध्यमातुन राहतील.

## 3. निवड सुची व कालमर्यादा

निवड समितीने तयार केलेली निवड सुची 01 वर्षाकरिता विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसुची व्यपगत होईल.

## 4. समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती

साप्रवि शासन पुरक पत्र क्रमांक:प्रानिमं-1217/प्र.क्र.92/17/13-अ दिनांक 02 डिसेंबर 2017 व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं 1216 /प्र.क्र.-65 /16 /13- अ दिनांक 13 जुन 2018 अन्वये परीक्षेचा निकाल तयार करतांना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| अ) आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| ब) वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| क) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमीक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमीक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणा-या उमदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.) |
| ड) वरीलप्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदांकरिता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणीक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

## 5. सर्वसाधारण सुचना

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारतांचा नागरीक असावा. | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. | अधिवास प्रमाणपत्र आवश्यक |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्राक क्र. मकसी 1007/प्र.क्र.36/का 36/ दिनांक 10 जुलै 2008 अन्वये महाराष्ट्र-कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या 865 गावातील मराठी भाषीक उमेदवारांना वरील पदांसाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी 865 गावांतील 15 वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिका-याचा विहीत नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील. |

**6. वयोमर्यादा :-**

**अ)**

1) उमेदवारांने जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहीत वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.

2) जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांकास उमेदवारांचे किमान वय 18 असावे.

**ब) सामाजीक व समांतर आरक्षणानुसार विहीत वयोमर्यादेचा तपशील खालीलप्रमाणे आहे-**

| अ.क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शासन निर्णयानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1 | मागासवर्गीय उमेदवार | 43 वर्षे |
| 2 | अपंग उमेदवार | 45 वर्षे |
| 3 | प्रकल्पग्रस्त | |
| 4 | भुकंपग्रस्त | |
| 5 | सन 1991 च्या जनगणना/सन 1994 नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| 6 | **स्वातंत्र्य** सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य | |
| 7 | शासकीय कर्मचारी/ जिल्हा परिषद नियमीत कर्मचारी/ (नियुक्ती प्राधिकारी/ सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहील. | |
| 8 | अंशकालीन कर्मचारी | 55 वर्षे |
| 9 | उच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवार | सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी 43 वर्षे |
| 10 | माजी सैनिक | सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-1010/प्र.क्र.279/10/16 अ दि. 20 ऑगस्ट 2010 अन्वये उमेदवारांच्या सशस्त्र दलांत झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक 3 वर्षे इतका राहील तसेच अपंग माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील. |
| 11 | अनाथ | खुला प्रवर्ग 38 वर्षे |

**याशिवाय विहीत वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथील केली जाणार नाही.**

| **(7) अर्ज भरण्याची कार्यपध्दती आणि सुचना :-** | |
|---|---|
| 1 | विहीत नमुन्यातील अर्जात उमेदवाराचे नाव, वडीलाचे /पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र,स्वाक्षरी ही मुलभुत माहिती आहे, जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| 2 | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदाहरणार्थ कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता, किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोष्ट ऑफीस,राज्य, जिल्हा, पिनकोड इत्यादि सहीत माहिती भरावी. |
| 3 | शैक्षणीक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणीक माहिती भरावी. शैक्षणीक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच पदाच्या अर्हतेनूसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| 4 | उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. |

| | |
|---|---|
| 5 | उमेदवारांना प्रवेशपत्र घेण्यास, लेखी/व्यावसायिक परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| 6 | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |
| 7 | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल. |
| 8 | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| 9 | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेतली जाईल. |
| 10 | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| 11 | **उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता मुलाखती नसल्याने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.** |
| 12 | ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत. |
| 13 | **प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज व प्रत्येक पदासाठी स्वंतत्र धनाकर्ष** (DD) **व सोबतच एक अतिरिक्त पासपोर्ट साईजचे छायाचित्र सादर करणे आवश्यक राहील** |

**(8) विशेष सूचना**

1. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनिय-1005/126/सेवा -4 दिनांक 31.10.2005 नूसार दिनांक 01.11.2005 रोजी किंवा त्यानंतर ज्याची शासकीय सेवेत नियुक्ती होईल. त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दि. 01.04.2015 पासून लागु केलेले राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (**NPS**) लागु राहील.
2. निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकीय सोय विचारात घेवून उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथमत: पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल.
3. सदर पदभरतीचे नियम / निकषातील पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णय/ परिपत्रक / अधिसूचना यानूसार बदल होवू शकतो.

**(9) इतर सर्वसाधारण सूचना**

1. पात्रता परीक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल.
2. फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहीत्यासह उमेदवाराला परिक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.
3. लेखी परिक्षेमध्ये फक्त काळया शाहीच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.
4. डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंर्तभुत असलेली कोणत्याही प्रकारची

साधने, सिमकार्ड ब्ल्यु-टुथ, दुरसंचार साधने म्हणुन वापरण्या योग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोट्स, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहीत्य परिक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परिक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परिक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

5. परवानगी नाकारलेल्या कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत साधन/साहित्य परिक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहीत्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद प्रशासन किंवा परिक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**( स्वा/-)**
(एफ. आर. कुतीरकर)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**तथा प्र.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली तथा सदस्य-सचिव, जिल्हा निवड समिती, गडचिरोली**

**( स्वा/-)**
(डॉ.विजय राठोड भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**
**सदस्य, जिल्हा निवड समिती, गडचिरोली**

**( स्वा/-)**
(शेखर सिंह भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, गडचिरोली तथा अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती, गडचिरोली**

# जिल्हा परिषद गडचिरोली
## सरळसेवेची भरती 2019
## मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक 06.07.2017 रोजीचे निर्णयानूसार रिक्त होणाऱ्या गट क व गट ड मधील अनुसूचित जमातीचे सरळसेवेची भरती 2019

**अर्जाचा नमुना**

| अलीकडील काढलेला फोटो |
|---|
| स्वाक्षरी |

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,गडचिरोली.

**विषय:-** ---------------------------------------------------------------- **या पदासाठी अर्ज सन 2019-20**

उपरोक्त जाहिरातीचे संबंधाने मी ------------------------------------ या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. आवश्यक माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उमेदवाराचे पूर्ण नांव (नांव प्रथम) (मराठीमध्ये) | | | | | | |
| | (In capital letters) ( इंग्रजीमध्ये) | | | | | | |
| 2 | पत्र व्यवहाराचा संपूर्ण पत्ता<br>पिनकोड क्रमांकासह<br>दुरध्वनी क्रमांक/मोबाईल नंबरसह | | | | | | |
| | ई- मेल ID | | | | | | |
| 3 | जात / पोटजात | | | | | | |
| 4 | अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे काय ?<br>असल्यास प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | होय / नाही | | | | | |
| 5 | जन्मतारीख (अंकात) | | | | | | |
| | जन्मतारीख (अक्षरात) | | | | | | |
| 6 | दिनांक 27/12/2019 रोजी वय | वर्ष | | महिने | | दिवस | |
| 7 | जन्म ठिकाण | गांव | | तालुका | | जिल्हा | |
| 8 | उमेदवारा खालील प्रवर्गापैकी असल्यास संबंधित प्रवर्ग नमूद करावा. योग्य ठिकाणी बरोबर खूण करावे.) | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उमेदवार पुरूष आहे की स्त्री | | | | | पुरूष / स्त्री |
| 2 | उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय ? | | | | | होय / नाही |
| 3 | उमेदवार माजी सैनिक आहे काय? | | | | | होय / नाही |
| 4 | उमेदवार भूकंपग्रस्त आहे काय? | | | | | होय / नाही |
| 5 | उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे काय? | | | | | होय / नाही |
| 6 | उमेदवार पदविधर अंशकालीन आहे काय? | | | | | होय / नाही |
| 7 | उमेदवार अपंग आहे काय? | | | | | होय / नाही |
| 8 | | अल्पदृष्टी | अस्थिव्यंग | कर्णबधीर | मुकबधीर | |
| 9 | उमेदवार राष्ट्रीय / राज्यस्तरीय खेळाडू आहे काय? | | | | | होय / नाही |
| | असल्यास खेळाचा प्रकार | | | | | |
| 10 | उमेदवार शासकिय कर्मचारी आहे काय? | | | | | होय / नाही |
| 11 | (असल्यास प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळेस कार्यालय प्रमुखाने प्रमाणपत्र सादर करावे लागेल) | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | धनाकर्षाचे विवरण :- | | | | |
| | बँकेचे व शाखेचे नांव | | धनाकर्ष क्रमांक | दिनांक | रक्कम |
| | | | | | |
| 10 | शैक्षणिक अर्हता | | | | |
| | अ.क्र. | परिक्षेचे नांव /पदवी/ पदविका नांव | संस्थेचे नांव / मंडळाचे नांव | प्राप्त गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
| | 1 | इयत्ता 4 थी | | | |
| | 2 | एस.एस.सी. (10 वी) | | | |
| | 3 | एच.एस.सी. (12 वी) | | | |
| | 4 | पदविका | | | |
| | 5 | पदवी | | | |
| | 6 | पदव्युत्तर पदवी | | | |
| | 7 | संगणक प्रमाणपत्र | | | |
| | 8 | मराठी टंकलेखन | | | |
| | 9 | इंग्रजी टंकलेखन | | | |
| | 10 | लघु टंकलेखन | | | |
| | 11 | वाहन अनुज्ञप्ती | | | |
| | 12 | इतर | | | |
| 11 | सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/ आदिवासी प्रकल्प अधिकारी यांचेकडे नांव नोंदणी केली आहे काय? | | | होय / नाही (असल्यास) ठिकाण<br>नोंदणी क्रमांक :-<br>दिनांक :- | |
| 12 | जिल्हा सैनिक मंडळाकडे नांव नोंदणी केली आहे काय? असल्यास नोंदणी ठिकाण, नोंदणी क्रमांक/वर्ष व वैधतेची तारीख | | | होय / नाही (असल्यास) ठिकाण<br>नोंदणी क्रमांक :-<br>दिनांक :-<br>वैधतेची तारीख:- | |

**मी असे प्रमाणित करतो/करते की आपले कार्यालयाकरीता ---------------------------------------------------- चीं पदे भरण्यासंबंधी जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून नमूद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरीता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील, याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिका-याचा निर्णय मला बंधनकारक राहील. व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.**

स्थळ :-
दिनांक:-

उमेदवाराची स्वाक्षरी